जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२०/१०/२०२३
## दि.१९/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७१२/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | अमेय जगताप,वय-२४ वर्षे,रा.३१०,सुभाषनगर,नवी खडकी,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | समीर मकरंद सावंत,वय-२२ वर्षे,रा.नेताजी शाळेसमोर,सुभाषनगर,येरवडा,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०२३ रोजी १८/१५ वा.नेताजी शाळे जवळील किराण दुकाना समोर,सुभाषनगर,नवी खडकी येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नेताजी शाळे जवळील किराणा दुकानात किराणा सामान आणणेसाठी गेले असताना,त्यांचे परिसरात राहणारा यातील नमुद इसमाने फिर्यादीस शिवीगाळ व धक्का-बुक्की करून,इथे थांबायचे नाही,मी बोलतो ना,तर ऐकायचे असे म्हणाल्याने फिर्यादी यांनी त्यास विचारणा केल्याचा राग मनात धरून,तु मला उलट बोलतो का,तुला माहिती नाही का,मी येरवडयाचा भाई आहे,तुला तर आज संपवुनच टाकतो असे बोलुन त्याचेकडील धारदार हत्याराने फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने,त्यांचे डोक्यात मारून,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच त्याचेकडील हत्यार हवेत फिरवुन परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, अन्सार शेख ८२३७६०९२०६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ४६९/२०२३,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१) (क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | पोलीस अंमलदार, तुकाराम पांढरे, लोणी-काळभार पो स्टे |
| **आरोपीत** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/३० वा. म्हसोबा मंदिर वाकडा पुल,सरतापवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एक पादचारी इसम आंनद नातु शिंदे,वय-६५ यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, खोसे ९८८१३१३३५३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ५१७/२०२३,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | मोहम्मद शुक्री,वय-३९ वर्षे,रा.मार्वल सांगारिया,महंमदवाडी,पुणे |
| **आरोपीत** | जश्न हॉटेल मधील एक कामगार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/१०/२०२३ रोजी रात्रौ ०१/०० वा.ते दुपारी १२/३० वा.चे दरम्यान जश्न हॉटेल, साळुखे-विहार रोड,वानवडी,पुणेचे ऑफीस मधील लोखंडी तिजोरीचे लॉकर मधुन |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा साळुंखे-विहार रोड,वानवडी,पुणे येथे जश्न हॉटेलचा व्यवसाय आहे. त्यांचे जश्न हॉटेल मधील लोखंडी तिजोरीचे लॉकर व त्यांचे ऑफीस हे कुलुप लावुन बंद करून गेले असताना,फिर्यादी यांचे सदर हॉटेल मध्ये काम करणारा कामगार यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे हॉटेलचे ऑफीसचा दरवाजा उघडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, ऑफीस मधील लोखंडी तिजोरीचे लॉकर उघडुन,हॉटेल व्यवसाया मधील २६,५४,०००/- रु रोख रक्कम व ३,००,०००/- रु किचे रोलेक्स कंपनीचे घड्याळ हे चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संतोष गायकवाड ८३०८९३२१०० |

## दि.२०/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २२१/२०२३,भादविक ५०६,५०४,४२७,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म अ‍ॅक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट अ‍ॅक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | ओमकार रणदिवे,वय-२१ वर्षे,रा.शिवतेजनगर,बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचे इतर ०३ साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०२३ रोजी रात्री ११/०० वा.जगताप डेअरी समोर,अप्पर डेपो-कोंढवा रोड,अप्पर बिबवेवाडी,पुणे येथे व दिनांक १९/१०/२०२३ रोजी पहाटे ०२/१५ वा.फिर्यादीचे राहते घरासमोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी यातील नमुद इसमाकडे असलेले उधारीचे पैसे मागीतलेच्या कारणावरुन दि.१८/१०/२०२३ रोजी रात्री ११/०० वा. फिर्यादी हे कामावर जात असताना,जगताप डेअरी समोर आले असता,सदर इसम व त्याचे इतर साथीदार यांनी आपसात संगनमत करून, फिर्यादीस धारधार हत्यार दाखवुन त्यांना शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर दि. १९/१०/२०२३ रोजी रात्री ०२/१५ वा.फिर्यादीचे घरासमोर येवुन,फिर्यादी यांचे घरावर धारधार हत्याराने मारहाण केली. तसेच फिर्यादी यांची घराबाहेर उभी असलेली दुचाकीची तोडफोड करुन तीचे नुकसान करून,त्यांचेकडील धारधार हत्यारे हवेत फिरवुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, राजकुमार बरडे ९०२८३१२३५३ |

### २१ ऑक्टोबर पोलीस स्मृतिदिन-२०२३

दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जातो. या दिवशी संपुर्ण वर्षात आपले कर्तव्य बजावत असताना कामी आलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस दलातर्फे मानवंदना देऊन श्रध्दांजली वाहण्यात येते. हा दिवस पोलीस दलाला अभिमानाचा,शौर्याला मानवंदना देण्याचा,त्याचबरोबर आपल्या जुन्या सहका-यांच्या स्मृतीने मन हेलावणाराही असतो.

२१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन पाळला जाण्यास १९५९ मध्ये लडाख भागातील सरहद्दीवर झालेली घटना कारणीभुत ठरली. भारत चीन सरहद्दीवर लडाख भागात १८ हजार फुट उंचीवर हॉट स्प्रिंग्ज नावाचे ठिकाण आहे. २१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हॉट स्प्रिंग्ज येथे गस्त चालु होती. गस्ती तुकडी नेहमीप्रमाणे गस्त घालण्यासाठी कुच करत हॉट स्प्रिंगच्या पुर्वेला ०६ मैल दुर ती आली असताना पर्वताच्या डाव्या बाजुला तुकडीच्या नेत्याला काही संशयास्पद खुणा दिसल्या. तुकडी त्या खुणांच्या अनुरोधाने पुढे चालु लागली आणि अचानक भयानक गोळीबार सुरू झाला. त्याठिकाणी पोलीस वीरांनी शौर्याने तोंड दिले. ही विशेष लढाई लढता-लढता यापैकी १० गस्ती शिपायांना वीरमरण आले व ९ जण जखमी अवस्थेत शत्रुच्या हाती सापडले. हे १० अमर शिपाई होते पुरणसिंग, धरमसिंग, इंगजित सुबा, नोरबु लामा, शिवनाथ प्रसाद, त्शेरिंग नोरबु, इमामसिंग, सवनसिंग, बेगराज आणि माखनलाल असे होते.

त्यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या छावणीवरही अचानक चिनी सैन्यांनी हल्ला केला होता. या लढाईत कामी आलेल्या या शुर पोलीस जवानांपैकी पश्चिम बंगालचे-३, हरियाणा-२, पंजाब-२, उत्तर प्रदेश-२, हिमाचल प्रदेश-१ असे होते. ही बातमी वा-यासारखी सा-या देशभर पसरली. १३ नोव्हेंबरला चिनी सैनिकांनी या हुतात्म्यांचे मृतदेह भारताच्या ताब्यात दिले. १४ नोव्हेंबरला सकाळी ०८/०० वा. हॉट स्प्रिंग्ज येथे त्यांच्या वर सन्मानपुर्वक अंत्यविधी करण्यात आले. त्यावेळी प्रत्येक राज्यातील पोलीस दलांनी त्या त्या ठिकाणी या वीरांना श्रध्दांजली अर्पण केली.

त्यानंतर पाटणा येथे १९५९ साली झालेल्या अखिल भारतीय पोलीस स्पर्धांच्या वेळी सर्वांनी अशी शपथ घेतली. **‘आमच्या हया वीर हुतात्म्यांचे स्मरण आम्ही दरवर्षी २१ ऑक्टॉबरला पोलीस हुतात्मा दिन पाळुन करू’** आणि तेव्हापासुन दरवर्षी हा दिन भारत वर्षात मोठया सन्मानाने **‘पोलीस हुतात्मा दिन’** म्हणुन पाळण्यात येतो. राज्या-राज्यातुन पोलीस दले या हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी संचलन आयोजीत करून त्यांना मानवंदना देतात.

**दि.१ सप्टेंबर २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२३** या कालावधीत देशातील सर्व राज्यात पोलीस दलाचे पोलीस जवान (सर्व दर्जाचे) असे एकुण **१८८** जवान यांनी आपले कर्तव्य बजावत असताना देह धारातीर्थी ठेवले. त्यामध्ये महाराष्ट्रातील **१.सहा.पो.निरी.सुदर्शन भिकाजी दातिर २.पो.हवा.गौरव नथुजी खरवडे ३.पो.हवा.जयंत विष्णुजी शेरेकर ४.पो.हवा. विठ्ठल एकनाथ बदने ५.पो.ना.संजय रंगराव नेटके ६.पो.ना.अजय बाजीराव चौधरी** अशा एकुण **०६** पोलीस जवानांचा समावेश आहे.

**मा.वाइस एडमिरल,(अजय कोच्छर),ए.व्हि.एस.एम,एन.एम.कमांडट,नॅशनल डिफेन्स ॲकडमी,खडकवासला,पुणे** हे वरील हुतात्म्यांना दिनांक २१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे श्रध्दांजली अर्पण करणार आहेत. सदर कार्यक्रमास मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक व इतर वरिष्ठ पोलिस अधिकारी हे हजर राहणार आहेत.

तरी नागरीक व प्रसार माध्यमांना आवाहन करण्यात येते की,पोलीस हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण दिनांक २१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ०७/५० वा.चे पुर्वी पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे उपस्थित राहावे.

सर्व वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी होणेस विंनती आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**